॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

आयुष्यात काहीतरी करून दाखवायचे
असेल तर टीकाकारांकडे
दुर्लक्ष करायला शिका.

■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. २३ नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १२७ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

टेन्शन

रात्र थोडी सोंगे फार
किती जगलो उरले चार
गोड बोलून होतात वार
जास्त टेन्शन नकोच यार

सर्वांना असते डोकेदुखी
जगात कोण बरे सुखी
रीलमध्ये सर्व जोडपे सुखी
भांडण स्टेट्सला कोण टाकी?

SPOT NEWS

कोयनेचे पाणी मुंबईकरांना मिळणार

● **नवी दिल्ली** – कोयनेचे पाणी आता मुंबईकरांची तहान भागवणार आहे. फडणवीस सरकारने यासंबंधीचा निर्णय घेतला असून, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी याबाबतची माहिती दिली. मुंबईकरांसाठी तब्बल ६७ टीएमसी नवा पाणी साठा उपलब्ध होणार आहे. कोयना जलविद्युत प्रकल्पातून समुद्रात जाणारे पाणी मुंबईला वळवण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत याबाबत चर्चा झाली. वीजनिर्मिती झाल्यानंतर बाहेर पडणारे अतिरिक्त पाणी मुंबईला वळवण्यात येणार आहे. जल बोगदे व पाईपलाईनच्या माध्यमातून मुंबईकडे पाणी वळवण्याबाबत चर्चा सुरू आहे. मुंबई व महानगरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता पुढील ५० वर्षांच्या पाण्याचे नियोजन सरकार करत आहे.

लाल कांद्याची आवक वाढली

● **नवी दिल्ली** – आशिया खंडातील कांद्याची प्रमुख बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लासलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीत कांद्याच्या बाजारभावात घसरण झाल्याने उत्पादक शेतक-यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. लाल कांद्याची आवक वाढली आहे. उन्हाळ कांद्याच्या दरावरही त्याचा परिणाम होत असून, दोन्ही प्रकारच्या कांद्याचे दर कमी झाले आहे.

भीषण अपघातात धुळ्याचे ९ भाविक ठार

खाटुश्याम दर्शनावरून परतताना कोटा येथे झाला अपघात । पवार कुटुंबावर काळाचा घाला

● **धुळे । वीरभूमी** –

राजस्थानमधील खाटू श्याम येथे देवदर्शन करून परतणाऱ्या धुळे जिल्ह्यातील भाविकांच्या वाहनाला कोटा येथे मध्यरात्री भीषण अपघात झाला. या दुर्दैवी घटनेत पवार कुटुंबातील नऊ जणांचा जागीच मृत्यू झाला. तर सहा जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे. सर्वांवर कोटा येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. एकाच कुटुंबातील आणि नात्यागोत्यातील ९ जणांचा मृत्यू झाल्याने धुळे शहरातील सत्यसाईबाबा नगर आणि परिसरावर शोककळा पसरली आहे.

कोटा (राजस्थान) येथील पोलीस नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या माहितीनुसार, धुळे जिल्ह्यातील भाविक तीन वाहनांतून खाटू श्याम येथे देवदर्शनासाठी गेले होते. दर्शन आटोपून परत येत असताना या तीन वाहनांपैकी MH-18/CL/3005 या क्रमांकाच्या फोर्स ट्रॅव्हलर वाहनाचा काल रात्री १२ वाजेच्या सुमारास



कोटा येथे भीषण अपघात झाला. या वाहनात एकूण १५ प्रवासी होते. त्यापैकी ९ जणांचा जागीच अंत झाला, तर ६ जण जखमी झाले. सर्व मृतदेह कोटा येथील न्यू मेडिकल कॉलेज रुग्णालयात ठेवण्यात आले आहेत.

या दुर्दैवी घटनेनंतर अपघातग्रस्त कुटुंबातील एका सदस्याने रात्री नेमके काय घडले, याचा थरारक अनुभव बोलून दाखवला. अपघातग्रस्त कुटुंबातील व्यक्तीचा फोन कुटुंबातील इतर व्यक्तींना मिळाल्यानंतर कुटुंबीयांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतल्याची माहिती समोर आली आहे.

अपघाताची माहिती देताना नातेवाईकाने सांगितले की, 'आम्ही सर्वजण ३६ नातेवाईक मिळून तीन गाड्यांमधून खाटूश्यामजींचे दर्शन घेतले होते. यानंतर आम्ही घरी परत जाण्यासाठी दिशेने परततलो. प्रवासादरम्यान आम्ही एका हॉटेलवरही थांबलेलो. यातील आमच्या दोन गाड्या मागे राहिल्या, तर अपघातग्रस्त तिसरी गाडी पुढे निघून गेलेली. तेवढ्यात बहिणीचा फोन आला की आमच्या गाडीचा अपघात झाला.

ही बातमी कळताच आम्ही तात्काळ घटनास्थळी धाव घेतली होती.'' नातेवाईक पुढे म्हणाले की, जेव्हा ते घटनास्थळी पोहोचले तेव्हा गाडीचा चक्काचूर झालेला दिसला. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल केले गेले. दुसरीकडे, कोटाचे अतिरिक्त जिल्हाधिकारी राजेश जोशी यांनी या घटनेची चौकशी केली.

मंत्रालयातील लिपिकांचे 'काम बंद'आंदोलन; राज्यातील कारभार होणार ठप्प?

● **मुंबई । वीरभूमी** –

मंत्रालयातील कामकाज आगामी काळात ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे समोर आले आहे. मंत्रालयातील लिपीक वेतनश्रेणी सुधारणा आणि पदनाम बदलाची दीर्घकाळापासून मागणी करत आहेत. मंत्रालयातील संघटनांच्या वतीने १८ नोव्हेंबर रोजी मंत्रालयातील आरसा गेटवर आंदोलन करण्यात आले होते. आता शासनाने निर्णय न घेतल्यास २५ नोव्हेंबर रोजी बेमुदत काम बंद आंदोलन छेडले जाईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

मंत्रालयातील कामकाजासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा टप्प्यांतून कर्मचा-यांची निवड झाली आहे. निवड झालेले कर्मचारी मंत्रिमंडळ व विधिमंडळ कामकाज, धोरणात्मक निर्णय, न्यायालयीन प्रकरणे आणि शासन निर्णयांचे गोपनीय मसुदे तयार करण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडताहेत. मात्र, त्यांना मिळणारे वेतन अत्यंत तुटपुंजे असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

मुंबईसारख्या महागड्या शहरात नव्याने रुजू झालेल्या लिपिकाला साधारण ३५ हजार रुपये दिले जात आहेत. घरभाडे, मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुंबईतील प्रवासखर्च हे वेतन अपुरे ठरत आहे. यामुळे कर्मचाऱ्यांचे आर्थिक आणि मानसिक स्वास्थ धोक्यात आल्याचा दावा संघटनेने व्यक्त केला आहे. वेतनवाढ होत नसल्याने अनेक तरुण कर्मचारी नोकरी सोडू लागले आहेत.

नोकरी सोडणारे तरुण आता जिल्हास्तरीय सेवांकडे वळत आहेत. त्यात मंत्रालयातील ४० टक्के लिपिक पदे रिक्त आहेत. मागील काही दिवसांत वस्तू व सेवा कर विभागातील कर सहाय्यक, मुंबई महापालिका, उच्च न्यायालय आणि विधानमंडळातील समकक्ष पदांच्या वेतनश्रेणीत आणि पदनामात सुधारणा करण्यात आली आहे. परंतु मंत्रालयीन लिपिकांवरच हा अन्याय का, असा सवाल संघटनेने विचारला आहे.

धुळ्याच्या महापौरांनी घेतले विषारी द्रव्य

● **धुळे । वीरभूमी** –

धुळ्यामधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. धुळ्याच्या महापौर माया परदेशी यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे. महापौर माया परदेशी यांनी विष प्राशन केल्याची माहिती आमदार अनुप अग्रवाल यांनी दिली आहे. या घटनेनंतर त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू असून, सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, सोशल मीडियावर होणा-या बदनामीकारक पोस्टला कंटाळून धुळे महानगरपालिकेच्या भाजपच्या महिला महापौर मायादेवी परदेशी यांनी विष प्राशन केल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत भाजप आमदार अनुप अग्रवाल यांनी माहिती दिली असून, या घटनेनंतर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर महापौर मायादेवी परदेशी यांच्यासंदर्भात अत्यंत आक्षेपार्ह आणि बदनामीकारक मजकूर व्हायरल केला जात होता. यामुळे सततच्या मानसिक त्रासाला आणि बदनामीला कंटाळून महापौरांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे.

त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या विघ्नहर्ता रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तसेच, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणी संजय शर्मा नावाच्या व्यक्तीविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सध्या त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून, परिसरात त्यांच्या समर्थकांनी मोठी गर्दी केली आहे. तर या घटनेच्या निषेधार्थ आज धुळ्यात मोठ्या संख्येने महिलांनी एकत्र येत निषेध मोर्चा काढला. या मोर्चात आमदार अनुप अग्रवाल हे देखील सहभागी झाले होते.

महिला लोकप्रतिनिधींची अशा प्रकारे सोशल मीडियावर बदनामी करणा-या प्रवृत्तींवर पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी आमदार अनुप अग्रवाल यांनी या मोर्चाच्या माध्यमातून केली आहे. या घटनेमुळे धुळ्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

'लोकतंत्र बचाव, भीडतंत्र हटाव' रॅलीतून विखे पाटलांचा काँग्रेसवर हल्लाबोल

'देश संसदेतून चालेल, परदेशातून नाही'। दिल्लीगेटवरील सभेत राहुल गांधी यांच्यावर टीका, लोकशाहीच्या संरक्षणाचा भाजपचा निर्धार

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –

'लोकतंत्र बचाव, भीडतंत्र हटाव' महारॅली हे कोणतेही शक्तिप्रदर्शन नसून लोकशाही व्यवस्थेच्या संरक्षणाचा निर्धार आहे. हा देश संसदेतून चालेल, परदेशातून नाही. तुमच्या धाक-दडपशाहीला देशातील जनता थारा देणार नाही, असा इशारा जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिला.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने अहिल्यानगर शहरात 'लोकतंत्र बचाव, भीडतंत्र हटाव' महारॅलीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेल्या या रॅलीचा समारोप दिल्लीगेट येथे जाहीर सभेने झाला. या रॅलीत सभापती प्रा. राम शिंदे, आमदार मोनिका राजळे, आमदार अक्षय कर्डिले, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, उपमहापौर धनंजय जाधव, भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, शहराध्यक्ष अनिल मोहिते, नितीन दिनकर यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सभेत बोलताना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली. वर्षानुवर्षे देशात काँग्रेसची सत्ता असताना संविधान दिन साजरा करण्याची भावना त्यांना झाली नाही. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संविधान दिन साजरा करण्याचा निर्णय घेऊन भारतीय संविधानाप्रती आदर व्यक्त केला, असे त्यांनी सांगितले.

अहिल्यानगर जिल्हा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाते विशेष असल्याचे सांगत, बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीतून काँग्रेसला इशारा देत विखे पाटील म्हणाले, देश संविधानाच्या आधाराने पुढे जाईल, धाक-दडपशाहीच्या जोरावर नाही.

मागील काही दिवसांपासून काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांकडून संविधानाच्या नावाखाली अराजक माजवून देशातील वातावरण कलुषित करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप मंत्री विखे पाटील यांनी केला. काँग्रेसच्या भूमिकेला आता कोणताही ठोस आधार राहिलेला नाही. सातत्याने निवडणुकांमध्ये होत असलेल्या पराभवामुळे काँग्रेस नेते हतबल झाले असून, त्यांच्याकडे ठोस विचार उरलेला नाही, अशी टीका त्यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मागील बारा वर्षांत देशाने विविध क्षेत्रांत प्रगती केली असून, भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करीत आहे. देशाची अर्थव्यवस्था मजबूत होत आहे. मात्र, ही प्रगती काही परदेशी शक्तींना पाहवत नसल्याने त्यांच्या प्रभावातून देशाला बदनाम करण्याचे काम काँग्रेसकडून होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

संविधान हातात घेऊन राहुल गांधी फिरत असले, तरी देशातील जनता दूधखुळी नाही. काँग्रेसने आजपर्यंत संविधानाची कशी पायमल्ली केली, हे जनतेला ठाऊक आहे. लोकसभेच्या मागील अधिवेशनांमध्ये महत्त्वाच्या विषयांवरील चर्चेत काँग्रेसने सहभाग घेतला नाही. संविधानाच्या आधाराने चर्चा करण्याची मानसिकता काँग्रेस नेत्यांमध्ये नसल्याचा आरोपही विखे पाटील यांनी केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान अस्तित्वात असेपर्यंत लोकशाहीची लढाई संसदेतच होईल.



मात्र, रस्त्यावर लढण्याची वेळ आली, तरी भाजपचा कार्यकर्ता मागे हटणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित भारत घडविण्याचे ध्येय असल्याचे सांगताना विखे पाटील म्हणाले, विकसित भारतात गरीब नागरिकांना न्याय, शेतकऱ्यांना सन्मान, युवकांना रोजगार आणि प्रत्येक नागरिकाला विकासाच्या संधी मिळाल्या पाहिजेत. राजकारणापेक्षा राष्ट्रहित महत्त्वाचे असून, संविधानाचा सन्मान आणि लोकशाही संस्थांवरील विश्वास अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येकाने कटिबद्ध राहिले पाहिजे.

सभापती प्रा. राम शिंदे यांनी आपल्या भाषणात स्वातंत्र्याच्या संघर्षाचा आणि लोकशाहीच्या मूल्यांचा उल्लेख केला. अतिशय त्यागातून मिळालेले स्वातंत्र्य लोकशाहीमध्ये परिवर्तित झाले आहे. निवडणुकांमध्ये पराभव होतो, जनतेला विचार पटत नाही, तेव्हा विरोधी पक्ष म्हणूनही योग्य भूमिका बजावता आली पाहिजे. मात्र, दुर्दैवाने देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संविधानिक संस्थांची बदनामी करण्याचे काम सुरू असल्याची टीका त्यांनी केली.

जनतेचा कधीच विचार न केलेल्यांना चोख उत्तर देण्यासाठी ही रॅली आयोजित करण्यात आली असल्याचे प्रा. शिंदे यांनी सांगितले.

यावेळी आमदार मोनिका राजळे, आमदार अक्षय कर्डिले आणि डॉ. सुजय विखे पाटील यांनीही उपस्थितांना संबोधित केले.

वीरभूमी

पदापेक्षा जनतेचा विश्वास मोठा व जनतेच्या प्रेमापेक्षा मोठे पद नाही

डॉ. सुजय विखे पाटील । अस्तगाव येथे विविध विकासकामांचे उद्घाटन व भूमिपूजन व व्यापारी संकुलाचे लोकार्पण

● **शिर्डी । वीरभूमी–**

राजकारणात पदे येतात आणि जातात; मात्र पद नसतानाही जनतेकडून मिळणारा सन्मान आणि विश्वास हीच खरी कमाई असते, असे प्रतिपादन भाजपा प्रदेश उपाध्यक्ष तथा अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

अस्तगाव येथे व्यापारी संकुलाच्या लोकार्पणप्रसंगी तसेच विविध विकासकामांच्या उद्घाटन व भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.या प्रसंगी अस्तगावसह पंचक्रोशीतील भाजपा, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून अस्तगावसह पंचक्रोशीतील गावांमध्ये दहा कोटी ४१ लाख रुपयांपेक्षा अधिक निधीच्या विविध विकासकामांचा उद्घाटन सोहळा तसेच व्यापारी संकुलाचे लोकार्पण मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या व्यापारी संकुलाला 'नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व्यापारी संकुल' असे नाव दिल्याबद्दल डॉ. सुजय विखे पाटील यांनी ग्रामस्थांचे आभार मानले. यावेळी त्यांनी गरजू छोट्या व्यावसायिकांना व्यापारी संकुलातील गाळे विनामूल्य देण्याची घोषणा करत, या गाळ्यांवर कोणत्याही राजकीय पुढाऱ्याचा किंवा पदाधिकाऱ्याचा हक्क राहणार नसल्याचे स्पष्ट केले.

अस्तगावशी विखे पाटील कुटुंबाचे अनेक वर्षांपासून जिव्हाळ्याचे नाते आहे. आजोबा आणि वडिलांपासून या गावाशी ऋणानुबंध जोडले गेले असून, गावाच्या प्रत्येक प्रश्नात योगदान देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला असल्याचे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले. जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर अस्तगावमध्ये कार्यक्रम घेण्यामागे ग्रामस्थांची भेट घेणे आणि अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या व्यापारी संकुलाचे काम पूर्णत्वास नेणे हा उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, व्यापारी संकुल उभारण्यासाठी सुरुवातीला गावातील व्यावसायिकांकडून वर्गणी जमा करण्याचा विचार होता. मात्र, बैठकीत फिटर, पंक्चर काढणारा, टेलर, भांडी विक्रेता, चहावाला आणि किराणा दुकानदार अशा छोट्या व्यावसायिकांची परिस्थिती पाहिल्यानंतर त्यांच्या मनात वेगळाच विचार आला. या गरजू व्यावसायिकांकडून पैसे घेऊन संकुल उभारायचे असेल, तर आपल्याला पदावर राहण्याचा अधिकार नाही, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. जनतेने दिलेली सत्ता आणि पद सर्वसामान्यांच्या उपयोगासाठी आले नाही, तर त्या पदाला काहीच अर्थ उरत नाही. त्यामुळे गाळे बांधून ते गरजू व्यावसायिकांना विनामूल्य देण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच व्यापारी संकुलातील गाळ्यांचे वाटप चिठ्ठीद्वारे पारदर्शक पद्धतीने केले जाणार आहे. संबंधित व्यावसायिकांना पंचायत समिती कार्यालयात बोलावून ही प्रक्रिया पूर्ण केली जाईल. कोणत्या व्यावसायिकाला कोणता गाळा मिळेल, हे चिठ्ठीद्वारे निश्चित होणार असून, जागेच्या पसंतीवरून वाद न करता सर्वांनी या प्रक्रियेला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच गावातील पुढारी, पदाधिकारी किंवा राजकीय वजन असलेल्या व्यक्तींना गाळे दिले जाणार नसल्याची भूमिका त्यांनी ठामपणे मांडली.

राजकारणात पद मिळविण्यासाठी होणाऱ्या स्पर्धेवर भाष्य करताना त्यांनी कार्यकर्त्यांना महत्त्वाचा संदेश दिला. सरपंच, सोसायटीचे चेअरमन किंवा बाजार समितीचे सभापती होण्यापेक्षा पद नसतानाही लोक आपल्याला सन्मान देतात का, हे अधिक महत्त्वाचे आहे. पदामुळे मिळणारा सन्मान तात्पुरता असतो; मात्र जनतेच्या कामातून मिळालेला विश्वास कायम राहतो. त्यामुळे पदामागे धावण्याऐवजी जनतेची कामे निःस्वार्थ भावनेने करावीत, असे ते म्हणाले.

लोकसभा निवडणुकीतील पराभवाचाही त्यांनी यावेळी उल्लेख केला. पराभवानंतरही कार्यकर्त्यांनी आणि जनतेने आपल्यावरील विश्वास कायम ठेवला. याच प्रेमाच्या आणि आशीर्वादाच्या बळावर आज जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदापर्यंत पोहोचता आले, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. जिल्ह्यातील राजकीय घडामोडींचा संदर्भ देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचाही त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

गावाच्या विकासकामांचा आढावा



घेताना पाणीप्रश्न, गोदावरी कालव्याची कामे, रस्ते आणि पथदिव्यांच्या कामांचा त्यांनी उल्लेख केला. अस्तगावसह मोरवाडी, तरकसवाडी, चोळकेवाडी आणि परिसरातील गावांमध्ये पाणी पोहोचविण्यासाठी झालेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली. मोरवाडी तलावातील अतिक्रमणामुळे निर्माण झालेला पाणी साठवणुकीचा प्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या कामाचाही त्यांनी उल्लेख केला. नगर-मनमाड महामार्गाच्या कामामुळे अस्तगाव ते शिर्डी प्रवास अधिक सुलभ झाल्याचे सांगताना त्यांनी रस्त्यावरील पथदिव्यांच्या व्यवस्थेची माहिती दिली. डांगे शाळेपासून सावळीविहीरपर्यंत दर ५० फुटांवर, तर डांगे शाळेपासून कोल्हारपर्यंत दर १०० फुटांवर पथदिवे बसविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच व्यापारी संकुलाच्या परिसराचाही आगामी काळात विकास करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

महिला आणि मुलींची सुरक्षितता हा महत्त्वाचा विषय असल्याचे सांगत तालुक्यातील गुन्हेगारीविरोधात कठोर भूमिका घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. जनतेच्या हितासाठी काही वेळा अप्रिय भूमिका घ्यावी लागते. त्यातून राजकीय विरोध किंवा शत्रुत्व निर्माण झाले तरी त्याची पर्वा करणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच जात आणि धर्माच्या नावावर समाजात तेढ निर्माण करण्याच्या प्रवृत्तीवरही त्यांनी भाष्य केले. पाणी, रोजगार, रस्ते आणि विकास या प्रत्येकाच्या मूलभूत गरजा आहेत. त्यांना कोणताही जातीय किंवा धार्मिक भेद नसतो. विखे पाटील कुटुंबाने कायम सर्वधर्मसमभावाची भूमिका जपली असून, साईबाबांच्या विचारांतून हीच शिकवण मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कार्यकर्त्यांनी घेतलेल्या मेहनतीचा उल्लेख करताना डॉ. विखे पाटील भावूक झाले. स्वतःच्या खर्चातून फटाके आणणे, जेसीबीच्या साहाय्याने हार तयार करणे, स्वागताची तयारी करणे आणि स्वतः हून कार्यक्रमाचे नियोजन करणे या गोष्टी कार्यकर्त्यांच्या निःस्वार्थ प्रेमाचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले. एका कार्यकर्त्याने स्वतः गाणे लिहून तयार केल्याचा उल्लेख करताना, कार्यकर्त्यांचे असे प्रेम हीच आयुष्यातील सर्वात मोठी कमाई असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

अस्तगावमध्ये उभारलेले व्यापारी संकुल ही केवळ इमारत नसून गावातील छोट्या व्यावसायिकांसाठी रोजगाराची संधी आहे. पुढील काळात गावातील मतभेद बाजूला ठेवून ग्रामपंचायत आणि सहकारी संस्थांच्या कामकाजात एकजुटीने पुढे येण्याचे आवाहनही त्यांनी केले.

स्नेहालयात लायन्स क्लबचा १९ वा दीपोत्सव उत्साहात

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

वंचित घटकातील मुलांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण फुलवून त्यांची दिवाळी गोड करण्याच्या उद्देशाने लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगर व लिओ क्लबच्या वतीने सलग १९ व्या वर्षी एमआयडीसी येथील स्नेहालयात दीपोत्सवाचे आयोजन केले होते. रांगोळ्यांनी सजलेले अंगण, लखलखत्या पणत्यांचा प्रकाश, फटाक्यांची आतषबाजी आणि संगीताच्या तालावर धरलेला ठेका अशा उत्साहपूर्ण वातावरणात वंचित घटकातील मुला-मुलींनी दिवाळीचा आनंद मनमुराद लुटला. या दीपोत्सवात स्नेहालयासह शहरातील आरएचईबी, बालभवन, बाबावाडी, बालगृह प्रकल्प, आनंद प्रेम संस्था, मानस ग्राम प्रकल्प, हिम्मत ग्राम प्रकल्प, बालगृह टाकळी आणि शासकीय बालगृहातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

वंचित घटकातील मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे, त्यांनाही सणाचा आनंद घेता यावा आणि समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन दिवाळी साजरी करावी, या सामाजिक भावनेतून लायन्स क्लबच्या वतीने दरवर्षी या दीपोत्सवाचे आयोजन केले जाते. यावर्षी दुष्काळाचे सावट असल्याने हा कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, मुलांनी दीपोत्सव साजरा करण्याचा आग्रह धरल्याने त्यांच्या आनंदासाठी यंदाही हा उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.

डॉ. एस.एस. दीपक आणि उद्योजक बाबूशेठ बोरा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष हरजितसिंह वधवा, सचिव हरीश हरवानी, खजिनदार विजय कुलकर्णी, लिओ अध्यक्ष हर्षवर्धन किथानी, लिओ सचिव रीत जाजू, ड. अनुराधा येवले, अशलता मुंडा, परमिका शेट्टी, संजीवनी गायकवाड, प्रशांत गायकवाड, प्रकल्प प्रमुख दिलीप कुलकर्णी, डॉ. अमित बडवे, प्रिया मुनोत, गुरनूरसिंग वाधवा, दिशा दोडेजा, स्नेहालयाचे डॉ. प्रा. गिरीश कुलकर्णी, हनीफ शेख, सपना असावा, लायन्सचे धनंजय भंडारे, प्रशांत मुनोत, डॉ. सिमरनकौर वाधवा, सुमित लोढा, संदेश कटारिया, अंजली कुलकर्णी, जपज्योतसिंग बग्गा आदीं उपस्थित होते.

'सहायक कृषी' संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी प्रवीण काजळे

राज्य प्रतिनिधीपदी युवराज शिंगटे यांची निवड

● **शेवगाव । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य सहाय्यक कृषी अधिकारी संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पदाची त्रैवार्षिक निवडणूक झाली. यात प्रवीण श्रीराम काजळे विजयी झाले. राज्य प्रतिनिधी (राज्य कार्यकारिणी सदस्य) पदाच्या निवडणुकीत युवराज जालिंदर शिंगटे निवडून आले. जिल्ह्यातील इतर पदाच्या निवडी बिनविरोध झाल्या.



जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी नितीन सोनवलकर व जिल्हा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी उमेश कदम यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य सहाय्यक कृषी अधिकारी संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष व राज्य प्रतिनिधी (राज्य कार्यकारिणी सदस्य) या पदाची निवडणूक झाली तर इतर पदांची निवडणूक बिनविरोध झाली.

जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत प्रवीण काजळे यांना ४८७ पैकी ४२९ मते मिळाली. अहिल्यानगर जिल्ह्यातील एकूण १४ तालुक्यांपैकी १२ तालुक्यांचे पसंती क्रमांक १ ची मते काजळे यांना मिळाली. राज्य प्रतिनिधी (राज्य कार्यकारिणी सदस्य) पदाच्या निवडणुकीत शिंगटे यांना ४८७ पैकी ३६८ मते मिळवून ते विजयी झाले.

नूतन जिल्हा कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : जिल्हाध्यक्ष : प्रवीण श्रीराम काजळे, राज्य कार्यकारिणी सदस्य युवराज जालिंदर शिंगटे, जिल्हा कार्याध्यक्ष : प्रतीक प्रल्हाद कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष गोरक्षनाथ आबासाहेब पठाडे, मोनिका संभाजी गांगर्डे, गणेश बबन भराट, विठाबाई चंदर मदेवाड, जिल्हा सचिव : विजय तुकाराम साबळे, खजिनदार : संतोष चिंधू साबळे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख : मंगेशकुमार सखाहरी बनकर, जिल्हा महिला प्रतिनिधी : प्रांजली भारत कवडे पाटील, जिल्हा संघटक : राजेश सुंदरलाल पन्हे, नीलेश प्रल्हाद ढाकणे, स्नेहल रावसाहेब चौधरी, संदिप अरविंद बडे अशी आहे.

आंतरराष्ट्रीय मल्ल तानाजी नरके यांचा इराणी खाण ते रंकाळा टॉवर असा थरारक जलप्रवास

● **अकोले । वीरभूमी–**

कोल्हापूरची पहाट अजून पूर्णपणे उमलली नव्हती. रंकाळ्याच्या विस्तीर्ण पात्रावर धुक्याची हलकी चादर पसरली होती. मात्र, रंकाळ्याच्या पलीकडील टोकाला असलेल्या 'इराणी खाणी'जवळ वेगळीच गूढ शांतता होती. इराणी खाणीचे काळेशार, अथांग आणि खोल पाणी पाहून भल्याभल्यांची छाती दडपते. पाण्यावर लहान-मोठ्या लाटा उसळत होत्या.

या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी काठावर उभा होता एक रांगडा मल्ल! आंतरराष्ट्रीय पैलवान, आशियाई पदकविजेता, अदम्य जिद्द आणि पोलादी आत्मविश्वास असलेला हा मल्ल म्हणजे तानाजी नरके.

त्यांचे लक्ष्य होते पलीकडे धुक्यात अस्पष्ट दिसणारा 'रंकाळा टॉवर'! सरळ रेषेत मोजले तरी सुमारे दोन किलोमीटरचे अथांग अंतर. रंकाळा टॉवरपर्यंतचा संपूर्ण जलप्रवास करण्याची त्यांची इच्छा होती. लहानपणापासूनच पोहण्याचा वेडा छंद जपणाऱ्या तानाजी नरके यांनी हे आव्हान पेलण्याचा निर्धार केला होता.

एक दीर्घ श्वास घेत त्यांनी समोरच्या अथांग जलाशयाला मनोमन वंदन केले आणि पुढच्याच क्षणी पाण्यात झेप घेतली. पाण्याचे फवारे आसमंतात उडाले. इराणी खाणीच्या थंडगार, खोल पाण्यात त्यांनी पोहण्यास सुरुवात केली. पहिल्या काही क्षणांतच पाण्याच्या गारठ्याने शरीराला वेढले; मात्र मनात धगधगणारा जिद्दीचा निखारा त्या थंडीपेक्षा कितीतरी पटीने प्रबळ होता. त्यांचे बळकट हात पाण्याला कापत पुढे सरकू लागले.

दोन किलोमीटरचे मूळ अंतर नागमोडी वळणांमुळे आणखी तीनशे ते चारशे मीटरने वाढले होते. खांदे जड होऊ लागले होते. फुप्फुसे ऑक्सिजनसाठी धडपडत होती. पाण्याचा प्रत्येक थेंब जणू त्यांची परीक्षा घेत होता. मात्र, मनात एकच ध्यास होता-रंकाळा टॉवर!

हा केवळ एका शरीराचा प्रवास नव्हता, तर एका पैलवानाच्या अफाट तपश्चर्येची कसोटी होती. २००८ साली आंतरराष्ट्रीय आशियाई कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक पटकावून देशाची मान उंचावणारा हा मल्ल आज पाण्यात आपली ताकद आजमावत होता. बी.ए., बी.पी.एड., एम.पी.एड. असे उच्च शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठेचा 'एनआयएस' (NIS) कोर्स पूर्ण करून त्यांनी स्वतःला शारीरिक, बौद्धिक आणि तांत्रिकदृष्ट्याही सिद्ध केले आहे. कोणत्याही संकटात न डगमगता शास्त्रीय पद्धतीने मार्ग काढण्याचे कौशल्य त्यांच्याकडे आहे. याच कौशल्याच्या बळावर त्यांनी पाण्यातील धोकादायक जाळ्यांच्या अडथळ्यांवर मात केली.

रंकाळा टॉवर आता स्पष्ट दिसू लागला होता. शेवटचे काहीशे मीटर उरले होते. शरीरातील उरली-सुरली सारी ताकद त्यांनी मनगटांत एकवटली. पाण्यावर हातांचे तडाखे अधिक वेगवान झाले. लाटा चिरत आणि फेसाळणारे पाणी मागे टाकत हा मल्ल विजयाच्या दिशेने झेपावला. प्रत्येक फटक्यागणिक इतिहास घडत होता. काठावर उभ्या असलेल्या लोकांच्या नजरा त्यांच्या प्रवासावर



खिळल्या होत्या.

अखेर तो सुवर्णक्षण आला! तानाजी नरके यांचा हात रंकाळा टॉवरच्या पायरीला लागला! अवघ्या २३ मिनिटे ४० सेकंदांत पाण्यातील जाळ्यांच्या अडथळ्यांवर मात करत सुमारे अडीच किलोमीटरचे हे खडतर अंतर पार करून त्यांनी अद्वितीय जलपराक्रम गाजवला. पाण्यातून बाहेर येताना त्यांच्या चेहऱ्यावर थकव्यापेक्षा दुर्दम्य विजयाचे तेज झळकत होते. कोल्हापूरच्या लाल मातीचा हा सुपुत्र आज पाण्यातही अजिंक्य ठरला होता!

आज पै. तानाजी नरके पुण्यश्लोक अहिल्यादेवीनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील राजूर येथील 'ड. एम. एन. देशमुख महाविद्यालय, साई कुस्ती आखाडा' येथे कुस्ती प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या तालमीत आज ६५ ते ७० तरुण मल्ल कुस्तीचे धडे गिरवत आहेत. या तरुण पैलवानांसाठी तानाजी नरके हे प्रेरणास्रोत आहेत. नव्या पिढीला यशाची दिशा दाखवणाऱ्या अखंड तेवणाऱ्या दीपस्तंभाप्रमाणे त्यांचे कार्य आहे.

> आपल्या या धाडसी जलप्रवासातून त्यांनी शिष्यांना आणि संपूर्ण महाराष्ट्राला मोठा संदेश दिला आहे– आखाडा मातीचा असो, मॅटचा असो की अथांग पाण्याचा; ज्याच्याकडे योग्य कौशल्य, अदम्य आत्मविश्वास आणि गुरुजनांचे संस्कार आहेत, त्याला जगातील कोणतीही शक्ती रोखू शकत नाही! पै. तानाजी नरके यांच्या या जाज्वल्य पराक्रमाला आणि त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीला मानाचा मुजरा!
>
> **– पै. गणेश मानुगडे,**
> कुस्ती मल्लविद्या महासंघ

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

भारदे साक्षरता मंडळाच्या वतीने गंगा-मृणालिनी व्याख्यानमालेचे आयोजन

● शेवगाव । वीरभूमी –

येथील भारदे साक्षरता प्रसारक मंडळाच्या वतीने मंगळवार ता.२४ ते सोमवार ता. ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत गंगा– मृणालिनी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असून व्याख्यानमालेचे हे दुसरे वर्ष आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रा. रमेश भारदे व सचिव हरीश भारदे यांनी दिली. व्याख्यानमालेत मंगळवार ता.२४ रोजी शिक्षणतज्ज्ञ सचिन जोशी (शिक्षणातील नव्या वाटा), बुधवार ता. २५ रोजी राष्ट्रीय भारुडकार हमीद सय्यद (महाराष्ट्राची लोककला), गुरुवार ता. २६ रोजी पुणे येथील सुप्रसिद्ध व्याख्याते शरद उपाध्ये (मन करा रे प्रसन्न), शुक्रवार ता.२७ रोजी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे फोटोग्राफर बैजू पाटील, शनिवार ता. २८ रोजी भारतीय संस्कृतीचे अभ्यासक सच्चीदानंद शेवडे (भारत–काल आणि आज) तर सोमवार ता. ३० रोजी जागतिक पातळीवरील हवामान अभ्यासक, कुल द ग्लोबची संस्थापक व युनोची लीड यंग इंडिया फेलो प्राची शेवगावकर हिला दुसरा पद्मभूषण बाळासाहेब भारदे स्मृती पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात येणार आहे. सकाळी१०.३० ते दुपारी १२ या वेळात भारदे हायस्कुलमध्ये होत असलेल्या या व्याख्यानमालेचा लाभ शहरातील नागरिक, शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी घ्यावा असे आवाहन प्राचार्य उमेश घेवरीकर यांनी केले.

ऑफलाईन प्रवेशांवरील दंड माफ करा; शिक्षक भारतीची मागणी

● अहिल्यानगर । वीरभूमी –

राज्यातील ऑफलाईन प्रवेश प्रक्रियेत झालेल्या सुमारे १८ हजार प्रवेशांप्रकरणी प्रति विद्यार्थी पाच हजार रुपये दंड आकारण्याच्या शिक्षण संचालनालयाच्या आदेशामुळे शैक्षणिक संस्थांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. या दंडाची एकूण रक्कम सुमारे नऊ कोटी रुपये होत असल्याने दंड प्रति संस्था आकारायचा की प्रति विद्यार्थी, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. हा दंड माफ करावा, अशी मागणी शिक्षक भारतीचे नेते तथा राज्यसचिव सुनील गाडगे यांनी मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. शालेय शिक्षण विभागाच्या १७ मार्च २०२१ रोजीच्या शासनपत्रानुसार, ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी परवानगी नसताना प्रवेश दिल्याबद्दल संबंधित संस्थेकडून पाच हजार रुपये दंड आकारण्याचे निर्देश होते. हा दंड विद्यार्थ्यांकडून वसूल करू नये, असेही स्पष्ट करण्यात आले होते. मात्र, शिक्षण संचालक (माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी ऑफलाईन प्रवेश दिलेल्या शाळा व महाविद्यालयांकडून प्रति विद्यार्थी पाच हजार रुपये दंड आकारण्याचे निर्देश दिले आहेत. या दोन्ही आदेशांतील फरकामुळे शैक्षणिक क्षेत्रात संभ्रम निर्माण झाल्याचे शिक्षक भारतीने म्हटले आहे. मूळ शासन आदेशात प्रति संस्था पाच हजार रुपये दंडाचा उल्लेख असताना संचालनालयाने प्रति विद्यार्थी दंड आकारण्याचा निर्णय कोणत्या आधारावर घेतला, असा सवाल संघटनेने उपस्थित केला आहे. विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेतील जबाबदारी त्यांच्यावर टाकू नये आणि शैक्षणिक संस्थांवरही अन्यायकारक आर्थिक बोजा पडू नये, अशी संघटनेची भूमिका आहे. शासनाच्या आदेशांमधील विसंगती दूर करून प्रति विद्यार्थी आकारण्यात येणारा पाच हजार रुपयांचा दंड माफ करावा आणि मूळ शासन आदेशानुसार निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी शिक्षक भारतीचे राज्यसचिव सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे उपाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, विजय लंके, आनंद झरेकर, आशादेवी लंके-गाडगे, पुणे विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, जिल्हा सचिव विजय कराळे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय पवार, कैलास जाधव, कार्यवाह संजय भुसारी, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सुदाम दिघे, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संतोष देशमुख, किसन सोनवणे, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, विभावरी रोकडे, मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुंज, छाया लष्करे, जया गागरे, रूपाली बोरुडे आणि सोनाली अकोलकर यांनी पाठपुरावा केला. विनाअनुदानित विभागाच्या राज्याध्यक्ष रूपाली कुरूमकर यांनीही या प्रश्नासाठी विशेष प्रयत्न केले.

पिंपळगाव खांड धरणातील गाळ काढण्याला प्राधान्य!

धरणाची उंची वाढविण्याबाबत सर्वेक्षणानंतर निर्णय । जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची ग्वाही

● अकोले । वीरभूमी–

पिंपळगाव खांड धरणातील गाळ काढून पाण्याची साठवण क्षमता वाढविण्याला जलसंपदा विभाग प्राधान्य देणार आहे. तसेच धरणाची उंची वाढविण्याबाबत सर्वेक्षणानंतर निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

कोतूळ येथे वरद विनायक देवस्थान ट्रस्ट आणि प्रवरा मेडिकल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने विश्व हिंदू परिषदेचे नेते स्व. अशोकजी सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित आरोग्य शिबिराचे उद्घाटन मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.



या कार्यक्रमास विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री शंकरजी गायकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक किशोर निर्मळ, विश्व हिंदू परिषदेचे प्रांतमंत्री किशोर चव्हाण, भाजपचे प्रदेश प्रवक्ते व जिल्हा प्रभारी लक्ष्मण सावजी, माजी आमदार वैभवराव पिचड, अगस्ती कारखान्याचे चेअरमन सीताराम पा. गायकर, ज्येष्ठ नेते सीताराम देशमुख, बाळासाहेब देशमुख, शिवाजी धुमाळ, बी. जे. देशमुख, अशोकराव देशमुख, रावसाहेब वाकचौरे, सुनीताताई भांगरे, सुनील दातीर, सुधाकर देशमुख, राहुल देशमुख, बाळासाहेब सावंत, वाल्मिक नवले, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रदीप भाटे, अगस्ती देवस्थानचे अध्यक्ष ड. के. डी. धुमाळ, विश्वस्त दीपक महाराज देशमुख, स्व. भाऊदाजी प्रतिष्ठानचे सचिव रवींद्र देशमुख, अरुण शेळके, राजेंद्र देशमुख, सुरेश देशमुख, बाळासाहेब वडजे, अमोल वैद्य, विजय पवार, बबलू धुमाळ, तुकाराम गोर्डे, बाळासाहेब मुळे, किशोर टेके, गणेश धुमाळ, नामदेव पिचड, डॉ. मनोज मोरे, अर्जुन गावडे, खंडूबाबा वाकचौरे, निलेश गायकर, धनंजय देशमुख, भाऊसाहेब वाकचौरे, वाल्मिक देशमुख, रेश्मा गोडसे, विद्या परशुरामी, गोकुळ वाघ, सुनील गिते आणि सचिन गिते यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले की, अकोले तालुक्याने केलेल्या त्यागामुळे अहिल्यानगर जिल्ह्याचे नंदनवन झाले, यात कोणताही संदेह नाही. स्व. मधुकरराव पिचड यांनी घेतलेल्या निर्णायक भूमिकेमुळे निळवंडे धरणाचा प्रश्न मार्गी लागला. पहिल्या २० किलोमीटरमधील कालव्यांची कामे झाली नसती, तर अद्यापही जिरायती भागाला पाणी मिळू शकले नसते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य दुष्काळमुक्त करण्याचा महायुती सरकारचा संकल्प आहे. दुष्काळ हा भूतकाळ करायचा असल्याने जलसंपदा विभागाने दुष्काळी भागाला पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन केले आहे. पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी मुळा आणि प्रवरा खोऱ्यात वळवून प्रकल्पांमध्ये अतिरिक्त पाणी उपलब्ध करण्याचे काम सुरू झाले आहे. या सर्वेक्षणासाठी २०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. यामुळे सुमारे ९१ टक्के पाणी उपलब्ध होईल, अशी माहिती मंत्री विखे पाटील यांनी दिली.

धामणगाव पाट येथील के.टी. वेअरचे रूपांतर बॅरेजमध्ये करण्यासाठी ४० कोटी रुपयांच्या निधीला लवकरच मान्यता देण्यात येणार आहे. आंबीत धरणाबाबतही लवकरच निर्णय घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले. उच्चस्तरीय डाव्या आणि उजव्या कालव्यांच्या आवर्तनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

भंडारदरा धरणाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने या भागात मोठ्या संख्येने पर्यटक यावेत आणि पर्यटनाच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती व्हावी, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

वरद विनायक ट्रस्टच्या वतीने आयोजित महाआरोग्य शिबिराच्या उपक्रमाचे कौतुक करताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, अशा शिबिरांच्या माध्यमातून सामान्य माणसाला आरोग्यविषयक उपचारांचे मार्गदर्शन मिळू शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने आयुष्मान भारत योजनेतून सुमारे पाच लाख रुपयांपर्यंतच्या उपचारांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी कर्करोगावरील औषधांच्या किमतींवर नियंत्रण आणल्यामुळे सामान्य रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्यातील महायुती सरकारने सुरू केलेल्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून नागरिकांना आरोग्याचे कवच मिळाले आहे. शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती सर्वसामान्यांना समजावी, यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि रुग्णालयांबाहेर माहितीचे फलक लावावेत, अशी सूचनाही त्यांनी केली.

लोकनेते बाळासाहेब विखे पाटील यांनी आदिवासी समाजाला आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या. उपचारांसाठी आधुनिक साधने उपलब्ध करून प्रवरा मेडिकल ट्रस्ट नेहमीच आरोग्यसेवेत पुढाकार घेत असल्याचेही मंत्री विखे पाटील यांनी नमूद केले.

अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगचे प्रारंभ; आठ संघांचे विजेतेपदासाठी संघर्ष

● अहिल्यानगर । वीरभूमी –

शहरातील फुटबॉल खेळाडूंच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग (ए.एफ.एस.एल.) २०२६ च्या पाचव्या पर्वाचा प्रारंभ नगर क्लबच्या मैदानावर मोठ्या उत्साहात झाला. शहरात कडाक्याची थंडी असतानाही मैदानावर उतरलेल्या आठही संघांतील खेळाडूंच्या दमदार खेळाने आणि चुरशीच्या सामन्यांनी वातावरण चांगलेच तापले आहे. सकाळपासून सुरू झालेले सामने रात्री उशिरापर्यंत रंगत असून, फुटबॉलप्रेमींना दिवस-रात्र सामन्यांचा थरार अनुभवायला मिळत आहे. नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी क्रीडा पत्रकार जोसेफ विल्यम्स, नमोह फुटबॉल क्लबच्या ओनर नमिता फिरोदिया, महावीर ग्रुपचे राजेश भंडारी, डॉ. अमोल जाधव यांच्यासह विविध संघांचे मालक व त्यांचे प्रतिनिधी, खेळाडू, प्रशिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटन सोहळ्यात खेळाडूंनी आपापल्या संघांचे ध्वज घेऊन संचलन केले. यावेळी खेळाडूंनी सादर केलेल्या नृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. उत्साहपूर्ण वातावरणात आणि दिमाखदार सोहळ्यात पाचव्या पर्वाचा शुभारंभ झाला.

प्रास्ताविक नमिता फिरोदिया यांनी केले. जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका म्हणाले की, मैदानी स्पर्धेतून खेळाडूंमध्ये शिस्त निर्माण होते. आपल्या देशात मोठ्या प्रमाणात गुणवत्ता आहे, मात्र त्याला प्रोत्साहन व व्यासपीठ देण्याची गरज आहे. अशा स्पर्धेतून खेळाडूंना प्रोत्साहन मिळत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. खेळातून शिस्त, बौद्धिक क्षमता व शारीरिक क्षमता विकसित होते. युवकांमध्ये आत्मविश्वास वाढतो. खेळावर प्रेम करा, खेळातून भरपूर तुम्हाला मिळेल. सध्या शहरी भागात मोबाईलमुळे मैदानावर खेळणे कमी झाले असले तरी अहिल्यानगरमध्ये मैदानावर खेळाडू दिसतात. येथे रुजलेल्या क्रीडा संस्कृतीचे हे प्रतीक आहे.

डॉ. अजित नवले यांना 'स्वराज्यसेनानी' किताबाने सन्मानित

गोकुळ दूध संघातील घडामोडींविरोधात 'शकुनी-तंत्रालय' नामकरण

● अहिल्यानगर । वीरभूमी–

शेतकरी, आदिवासी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणारे कॉम्रेड डॉ. अजित नवले यांना पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने 'स्वराज्यसेनानी' किताबाने सन्मानित करण्यात आले. लोकशाही मूल्यांचे रक्षण, संविधानाची अंमलबजावणी आणि सर्वसामान्यांच्या मूलभूत अधिकारांसाठी लढणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळावी, या उद्देशाने ही संकल्पना राबविण्यात येत आहे.

कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीनंतर मागच्या दाराने सत्ता मिळविण्यासाठी अध्यादेश काढल्याचा आरोप करत पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेने आंदोलन केले. या आंदोलनांतर्गत अहिल्यानगर येथील हुतात्मा स्मारक परिसरात महाराष्ट्र मंत्रालयाचे प्रतीकात्मक नामकरण 'शकुनी-तंत्रालय' असे करण्यात आले. लोकशाही आणि सहकार व्यवस्थेचे कथित वस्त्रहरण रोखण्याचा संदेश देण्यासाठी लोकशाहीच्या पुतळ्याला तिरंग्याची वस्त्रे नेसविण्यात आली.

स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय सत्तेविरुद्ध लढणाऱ्यांना 'स्वातंत्र्यसेनानी' म्हणून ओळखले जाते. त्याच धर्तीवर स्वातंत्र्यानंतर लोकशाही व्यवस्था मजबूत करण्यासाठी, संविधानातील मूलभूत अधिकार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि अन्यायकारक व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करणाऱ्यांना 'स्वराज्यसेनानी' म्हणून ओळख मिळावी, अशी या संकल्पनेमागील भूमिका आहे.

डॉ. अजित नवले यांनी शेतकरी चळवळीच्या माध्यमातून शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडली आहे. कष्टकरी कुटुंबांना न्याय, त्यांच्या श्रमाला योग्य मोबदला आणि शेतीविषयक समस्यांची सोडवणूक व्हावी, यासाठी त्यांनी विविध आंदोलने केली. तसेच वनजमिनीवर पिढ्यान्पिढ्या उदरनिर्वाह करणाऱ्या आदिवासींना जमिनीचे हक्क मिळावेत आणि वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठीही त्यांनी लढा दिला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांची 'स्वराज्यसेनानी' किताबासाठी निवड करण्यात आली.

गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत सतेज पाटील यांच्या गटाला १३, तर विरोधी गटाला १२ जागा मिळाल्या होत्या. मात्र, ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल असलेल्या संघीय सहकारी संस्थांवर शासननियुक्त प्रतिनिधी नेमण्याची तरतूद करणारा अध्यादेश ६ नोव्हेंबर रोजी काढण्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ७३अ(२) मध्ये बदल करून एका शासकीय अधिकाऱ्यासह मताधिकार असलेले चार शासननियुक्त सदस्य नेमण्याची तरतूद करण्यात आल्याचे संघटनांनी सांगितले.

या अध्यादेशाच्या आधारे गोकुळ दूध संघावर चार मताधिकार असलेले संचालक नियुक्त करण्यात आल्याने अल्पमतातील १२ सदस्यांच्या गटाला संख्याबळ मिळवून सत्ता हस्तगत करण्याचा मार्ग मोकळा झाल्याचा आरोप करण्यात आला. अध्यक्षपदाच्या निवडणुकीतही या पद्धतीचा वापर करून बहुमत असलेल्या विजयी गटाकडून सत्ता हिरावून घेतल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला.

१९६५ च्या भारत-पाक युद्धातील शहीद बबन जठार यांना मुंगुसगावात मानवंदना

शहीद स्मारकस्थळी सैनिक बांधवांसह ग्रामस्थांकडून आदरांजली । वीरपत्नी मथुराताई जठार व जठार परिवाराचा सन्मान

● श्रीगोंदा । वीरभूमी–

भारत-पाकिस्तानदरम्यान १९६५ मध्ये झालेल्या युद्धात देशाच्या रक्षणासाठी प्राणांची आहुती देणारे श्रीगोंदा तालुक्यातील मुंगुसगावचे वीरपुत्र शहीद बबन बाबाजी जठार यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. मुंगुसगाव येथील शहीद स्मारकस्थळी आयोजित कार्यक्रमात माजी सैनिक, सैनिक संघटनांचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि शिवदुर्ग ट्रेकर्स फाउंडेशनच्या सदस्यांनी पुष्पचक्र अर्पण करून शहीद जवानाला मानवंदना दिली.

यावेळी शहीद स्मारक कोअर कमिटीचे अध्यक्ष कॅप्टन दत्तात्रय गावडे, उपाध्यक्ष दादासाहेब साबळे, विसापूरचे अध्यक्ष राजेंद्र जठार, कॅप्टन शिंदे, कॅप्टन गटणे, मेजर प्रकाश मोटे, कोळगावचे सुभेदार विजय चौधरी, सुभेदार शहाजी नलगे यांच्यासह अनेक माजी सैनिक उपस्थित होते.

शिवदुर्ग ट्रेकर्स फाउंडेशन परिवाराच्या वतीने उपाध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कळमकर, संचालक सोमेश शिंदे, डॉ. संतोष कुताळ, चेतन चौधरी आणि मेजर बापुराव निंभोरे यांच्या हस्ते वीरपत्नी मथुराताई जठार, त्यागमूर्ती कलावती पोपटराव जठार यांच्यासह जठार परिवाराचा सन्मान करण्यात आला.

शहीद बबनराव जठार यांनी सैन्यदलातील सेवेदरम्यान सी.एस. मेडल, रक्षा मेडल आणि समर सेवा मेडल असे सन्मान प्राप्त केले होते. जम्मू-काश्मीरमध्ये पाकिस्तानी सैनिकांना रणांगणावर चोख प्रत्युत्तर देताना २६ सप्टेंबर १९६५ रोजी त्यांना वीरमरण आले. पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन घेण्याची आणि पत्नी मथुराताई यांच्यासोबत संसारातील भावी स्वप्ने साकार करण्याची त्यांची इच्छा मात्र अपूर्णच राहिली. त्यांच्या बलिदानाची आठवण आजही परिसरातील नागरिकांच्या मनात देशभक्तीची प्रेरणा जागवते.

या कार्यक्रमास वीरपत्नी मथुराबाई जठार, त्यागमूर्ती कलावती जठार, खंडेराव जठार, दिलीपराव जठार, विसापूर व मुंगुसगाव येथील ग्रामस्थ, नातेवाईक आणि मोठ्या संख्येने सैनिक बांधव उपस्थित होते. देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शहीद बबन बाबाजी जठार यांना श्रीगोंदेकर नागरिक, तालुक्यातील सैनिक संघटना आणि शिवदुर्ग ट्रेकर्स फाउंडेशन परिवाराच्या वतीने आदरांजली अर्पण केली.



वीरभूमी

धाराशिवच्या श्रीपतराव भोसले हायस्कूलने

कै. बाळासाहेब भारदे स्मृती करंडक पटकावला

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत ९३ विद्यार्थ्यांचा सहभाग; दोन गटांतील विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव

● **शेवगाव । वीरभूमी–**

येथील भारदे साक्षरता प्रसारक मंडळाने आयोजित केलेल्या पद्मभूषण कै. बाळासाहेब भारदे स्मृती करंडक आंतरशालेय राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आज रविवार ता. २२ रोजी शाळेच्या रावसाहेब पटवर्धन सभागृहात संपन्न झाल्या. या स्पर्धेत धाराशिव येथील श्रीपतराव भोसले हायस्कुलने मानाचा फिरता करंडक पटकावला.

सांगली, नांदेड, संभाजीनगर, बीड, पुणे व अहिल्यानगर जिल्ह्यातून ९३ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. इयत्ता ७ वी ते ९ वी या मोठ्या गटात प्रणव शशिकांत जाधव छत्रपती शिवाजी विद्यालय–दुधोडी, सांगली याने प्रथम, ऋतुराज भारत काकडे शारदा विद्यामंदिर –गेवराई याने द्वितीय, आर्या राहुल खराडे – सावित्रीबाई फुले विद्यापीठ शाळा, राहुरी हिने तृतीय क्रमांक मिळवला. प्रेरणा नितीन गंधुरे–श्रीपतराव भोसले हायस्कूल, धाराशिव व अदिती आत्माराम साबळे,श्री स्वामी समर्थ बालमंदिर, पाथर्डी , कल्याणी ज्ञानदेव खामकर – श्री तिलोक जैन विद्यालय, पाथर्डी यांनी उत्तेजनार्थ पारितोषिके प्राप्त केली.

४ थी ते ६ वी या लहान गटात प्रत्युष नवनाथ वनवे त्रिमूर्ती प्राथमिक विद्यालय खडका फाटा, नेवासे प्रथम, काव्या नितीन खिल्लारे – जेम्स स्टोन वर्ड स्कूल जालना द्वितीय, वेदिका मयूर शेकडे– विखे सीबीएससी स्कूल, शेवगाव हिने तृतीय क्रमांक मिळवला. शुभ्रा सुरेश म्हस्केआबासाहेब काकडे विद्यालय शेवगाव, अथर्व नितीन गंधुरे – श्रीपतराव भोसले हायस्कूल, धाराशिव व आर्यन हरिदास जायभाये –जि. प. प्राथमीक शाळा, दहिफळ जुने यांनी उत्तेजनार्थ पारितोषिके प्राप्त केली.

मोठ्या गटाचे परीक्षण महेश डाळींबकर, युवराज जगताप व बापूसाहेब गवळी यांनी तर लहान गटाचे परीक्षण जरीना शेख, विद्या दारकुंडे व रवी गोल्हार यांनी केले. विजेत्यांना प्रा. रमेश भारदे, रागिणी भारदे, हरीश भारदे व प्राचार्य उमेश घेवरीकर यांच्या हस्ते रोख रक्कम, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन निलेश मोरे यांनी तर प्रवीण बैरागी यांनी आभार मानले.



कै. बाळासाहेब भारदे स्मृती करंडक आंतरशालेय राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत विजेत्यांना मानाचा फिरता करंडक प्रदान करतांना प्रा. रमेश भारदे, रागिणी भारदे, हरीश भारदे, प्राचार्य उमेश घेवरीकर व इतर मान्यवर.

राजूर अपर तहसील कार्यालयाच्या मंजुरीने अकोले तालुका विभाजनाच्या लढ्याला पहिले मोठे यश!

आज कार्यालयाचे उद्घाटन व लोकार्पण । आदिवासी भागाला मिळणार दिलासा

● **अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्याच्या प्रशासकीय इतिहासात महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून, राजूर येथे अपर तहसील कार्यालय सुरू करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. या कार्यालयाचे सोमवारी उद्घाटन व लोकार्पण होणार आहे. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या राजूर स्वतंत्र तालुका निर्मितीच्या मागणीच्या लढ्याला यामुळे पहिले मोठे यश मिळाले असून, परिसरातील आदिवासी नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

अकोले तालुका भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण असून, तालुक्यातील दुर्गम आदिवासी गावांमधील नागरिकांना महसूल व शासकीय कामांसाठी अकोले येथे जावे लागत होते. अपुऱ्या दळणवळणाच्या सुविधा, लांबचा प्रवास आणि आर्थिक खर्च यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अनेकदा एका शासकीय कामासाठी संपूर्ण दिवस खर्च करावा लागत होता. ही गैरसोय दूर करण्यासाठी राजूर येथे स्वतंत्र तालुका निर्माण करण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात होती.

या मागणीसाठी आदिवासी संघटनांचे पदाधिकारी, व्यापारी संघटना, विविध गावांतील ग्रामपंचायती, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांनी ठराव व निवेदनांच्या माध्यमातून शासनाकडे पाठपुरावा केला.

माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या नेतृत्वाखाली आणि माजी आमदार वैभव पिचड यांच्या मार्गदर्शनाखाली समाजसेवक अनंत घाणे, तुकाराम खाडे यांच्यासह बाजीराव सगभोर, रामदास पिचड, भरत घाणे, सुनील पवार, मारुती खाडे, अशोक भोजने, दिलीप भागडे, ठकेस कडाळी, पंढरी खाडगीर, योगेश खाडे, दुंदा घाणे, भीमा लोटे, राजू भागडे, दिलीप भांगरे, विठ्ठल तातळे, रामदास लांडगे आदी कार्यकर्त्यांनी या मागणीसाठी सातत्याने प्रयत्न केले.

सन २०२३-२४ मध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, तत्कालीन महसूलमंत्री, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, नाशिक विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना निवेदने देऊन राजूर तालुका निर्मितीची भौगोलिक व प्रशासकीय गरज मांडण्यात आली होती. राजूर हे आदिवासी भागातील मध्यवर्ती ठिकाण असून, येथे आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासह न्यायालयीन, शैक्षणिक, वैद्यकीय व प्रशासकीय सुविधा उपलब्ध असल्याने स्वतंत्र प्रशासकीय व्यवस्था निर्माण करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले होते.

आदिवासी उपयोजनेचा निधी, विकासकामे आणि विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा असावी, अशी मागणीही करण्यात आली होती. अखेर शासनाने राजूर येथे अपर तहसील कार्यालयास मंजुरी दिल्याने या पाठपुराव्याला यश आले आहे.

या कार्यालयामुळे राजूर, शेंडी, भंडारदरा, वारंघुशी, रतनवाडी, मुतखेल, कोलटेंभे, वाकी, पेंढशेत तसेच परिसरातील दुर्गम आदिवासी गावांतील नागरिकांना महसूलविषयक कामांसाठी मोठी सोय होणार आहे. नागरिकांचा वेळ, पैसा आणि प्रवासाचा त्रास वाचण्यास मदत होणार आहे.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीला मिळालेल्या यशामुळे माजी मंत्री मधुकरराव पिचड, माजी आमदार वैभव पिचड तसेच समाजसेवक अनंत घाणे, तुकाराम खाडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या पाठपुराव्याची चर्चा परिसरात होत आहे.

प्रबुद्ध भारत घडविण्यासाठी तरुणांनी सामाजिक लढा हाती घ्यावा

डॉ. भीमराव आंबेडकर । कोपरगावात भव्य धम्म परिषदेच्या दहा दिवसीय श्रामणेर प्रशिक्षण शिबिराचा समारोप

● **कोपरगाव । वीरभूमी–**



बाबासाहेबांनी दिलेला बौद्ध धम्म हा केवळ धर्म नसून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायावर आधारित जीवनपद्धती आहे. धम्म घराघरांत पोहोचविल्यास बाबासाहेबांना अभिप्रेत असलेला समाज घडेल. त्यांच्या स्वप्नातील प्रबुद्ध भारत निर्माण करण्यासाठी तरुणांनी राजकीय आणि सामाजिक लढा हाती घ्यावा, असे आवाहन दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांनी केले.

कोपरगाव तालुक्यातील दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, समता सैनिक दल आणि अखिल भारतीय भिक्खू संघाच्या शहर व तालुका शाखांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्ट येथे दहा दिवसीय श्रामणेर प्रशिक्षण शिबिराचा समारोप आणि भव्य धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भदंत बी. संघपाल यांनी उपस्थितांना त्रिशरण व पंचशील दिले.

परिषदेला दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया व समता सैनिक दलाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर, चैत्यभूमीचे संचालक भदंत बी. संघपाल, भदंत सारिपुत्त, भदंत आनंदसुमनसीरी, भदंत धम्मसिरी, भदंत कश्यप, भदंत बुद्धवंश, राष्ट्रीय उपाध्यक्ष ॲड. एस. के. भंडारे, महाराष्ट्र राज्याध्यक्ष यू. जी. बोराडे, विश्वस्त डॉ. राजाराम बडगे, राज्य सरचिटणीस अशोक केदारे, राज्य संघटक गौरव पवार, केंद्रीय शिक्षक मनोजकुमार मोरे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष शांताराम रणशूर आणि जिल्हा सरचिटणीस नरेंद्र पवार आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. आंबेडकर म्हणाले की, बाबासाहेबांचा सामाजिक आणि राजकीय लढा केवळ धम्मापुरता मर्यादित नव्हता. तो सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाचा लढा होता. आता हा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची वेळ आली आहे. देशातील निवडणूक प्रक्रियेवरील वाढता अविश्वास चिंताजनक असून नागरिक आणि विद्यार्थी रस्त्यावर उतरत आहेत. निवडणूक आयोगावरील विश्वास कमी होणे ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे.

तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता व्यवसायाकडे वळून प्रगती साधावी. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर आता नव्या पिढीने आपल्या हक्कांसाठी लढा देण्याची गरज आहे. तरुणांनी एकत्र येऊन संघर्ष केल्याशिवाय समाजात खरी क्रांती घडणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते आंबेडकरी चळवळीत ५० वर्षांपासून योगदान देणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या कुटुंबीयांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

दहा दिवसीय श्रामणेर प्रशिक्षण शिबिर आणि धम्म परिषद यशस्वी करण्यासाठी तालुकाध्यक्ष विजय भातनकर, सरचिटणीस सिद्धार्थ मेहेरखांब, कोषाध्यक्ष रावसाहेब वाघ, उपाध्यक्ष (संरक्षण) रामनाथ जाधव, उपाध्यक्ष (प्रचार व पर्यटन) अजय विघे, अरुण लोढे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. सिद्धार्थ मेहेरखांब यांनी सूत्रसंचालन केले, तर विजय भातनकर यांनी आभार मानले.

दिवाळीच्या गर्दीतही पाथर्डीची वाहतूक सुरळीत ठेवणाऱ्या पोलिसांचा सन्मान!

नगराध्यक्ष अभय आव्हाड यांचा पुढाकार । शिवाजी नागरे व अल्ताफ शेख यांच्या कार्याचे कौतुक

● **पाथर्डी । वीरभूमी–**

दिवाळी, पाडवा आणि सलग सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गासह प्रमुख मार्गांवर वाहनांची प्रचंड वर्दळ वाढली होती. त्यातच अमावस्येनिमित्त तालुक्यातील मढी, मायंबा, वृद्धेश्वर यांसारख्या प्रसिद्ध देवस्थानांना भेट देणारे भाविक तसेच मोहटादेवी गडावर दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला होता. मात्र, पाथर्डी पोलीस ठाण्याच्या वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचारी शिवाजी नागरे व अल्ताफ शेख यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने केलेल्या उत्कृष्ट वाहतूक नियोजनामुळे या गर्दीच्या काळातही शहरातील वाहतूक सुरळीत राहिली. विशेष म्हणजे, या कालावधीत शहर व परिसरात कोणताही अपघात घडला नाही. पोलिसांच्या या कर्तव्यदक्ष कामगिरीचे कौतुक करत पाथर्डी शहरवासीयांच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

कल्याण–विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग तसेच छत्रपती संभाजीनगर–बारामती मार्गावरून दिवाळीच्या काळात मोठ्या प्रमाणात वाहनांची ये–जा सुरू होती. पुणे, मुंबई, कल्याण यांसारख्या शहरांत नोकरी–व्यवसायानिमित्त स्थायिक झालेले नागरिक सणासुदीच्या सुट्ट्यांसाठी मोठ्या संख्येने ग्रामीण भागात दाखल झाले होते. तसेच मराठवाड्यातील परभणी, हिंगोली, नांदेड, बीड आदी जिल्ह्यांना जोडणारा जवळचा मार्ग असल्याने या रस्त्यावरील वाहतुकीतही मोठी वाढ झाली होती.

याशिवाय तालुक्यातील प्रमुख देवस्थानांवर अमावस्या व सुट्ट्यांच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने पाथर्डी शहरातील वाहतुकीचे नियोजन करणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. कोरडगाव चौक (डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक), जुने बसस्थानक चौक (नाईक चौक) यांसह शहरातील प्रमुख चौकांमध्ये नेहमीच वाहतूक कोंडी होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. अशा परिस्थितीत वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांची पूर्णवेळ उपस्थिती अत्यंत महत्त्वाची ठरते.

ही परिस्थिती लक्षात घेऊन पोलीस कर्मचारी शिवाजी नागरे व अल्ताफ शेख यांनी दिवाळीच्या चार–पाच दिवस आधीपासूनच वाहतूक नियंत्रणाची जबाबदारी प्रभावीपणे सांभाळली. कधी दिवसभर तर कधी रात्री उशिरापर्यंत कर्तव्यावर राहून त्यांनी चौकाचौकांतील वाहतूक सुरळीत ठेवली. आपल्या इतर सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी केलेल्या नियोजनामुळे वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला. प्रचंड वाहनवर्दळ असूनही वाहतूक कोंडी अथवा अपघाताची परिस्थिती निर्माण होऊ न देणे, ही त्यांच्या कामगिरीची विशेष बाब ठरली.

पोलिसांनी दाखविलेली ही कर्तव्यतत्परता आणि प्रामाणिक सेवाभाव लक्षात घेऊन शहराचे प्रथम नागरिक नगराध्यक्ष अभयराव आव्हाड यांनी पुढाकार घेतला.



त्यांच्या उपस्थितीत माजी नगराध्यक्ष मृत्युंजय गर्जे, माजी उपनगराध्यक्ष तथा विद्यमान बांधकाम विभागाचे सभापती व नगरसेवक बंडू बोरुडे, उद्योजक ज्ञानेश्वर कोकाटे, गणेश सोनटक्के, माजी नगरसेवक बबनराव सबलस, सामाजिक कार्यकर्ते रोहित रणखांब, सोनू डोमकावळे, राहुल तरवडे, आणि सीए स्वप्नील पलोड यांनी पोलीस कर्मचारी शिवाजी नागरे व अल्ताफ शेख यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सन्मान केला.

सणासुदीच्या काळात नागरिक आपल्या कुटुंबीयांसोबत आनंदोत्सव साजरा करत असताना पोलीस कर्मचारी मात्र नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी रस्त्यावर अहोरात्र कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या या सेवाभावाची दखल घेऊन सार्वजनिक स्तरावर कौतुक आणि सन्मान होणे ही निश्चितच सकारात्मक बाब आहे. पोलिसांच्या चांगल्या कामाचे कौतुक करून त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप टाकण्याचा नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी घेतलेला पुढाकार शहरवासीयांसाठी कौतुकास्पद ठरला आहे.